# <u>बीज भांडवल योजना</u>

सदर योजना राज्य शासनाची असून सन १९९३ पासून राज्यभर जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयामार्फत राबविली जाते. राज्यातील तांत्रीकदृष्टया सक्षम असलेले अनुभवी कारागिर तंत्रज्ञ ज्यांना स्वत:चा व्यवसाय उभा करण्याची प्रबळ इच्छा आहे तथापि, बँकेकडून कर्ज उपलब्ध करुन घेण्यासाठी स्व्त:चे २५ टक्के बीज भांडवल नसल्याने सदर उमेदवाराला इच्छा असूनही स्वत:चा रोजगार उभा करता येणे शक्य नाही अशा योजनेअंतर्गत पात्र सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना शासनामार्फत या योजनेअंतर्गत १५ टक्के बीज भांडवल रक्कम अदा करुन स्वत:चा रोजगार उभा करण्यासाठी कर्जरुपाने अर्थसहाय दिले जाते.

## <u>पात्रता</u>

१.शिक्षण- किमान ७ वी पास असावा.

**२.वयोमर्यादा**-१८ ते ५० वर्षे

३.वार्षिक उत्पन्न-कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची अट नाही.

४.उमेदवार - बेरोजगार असावा

५.वास्तव्य-उमेदवार महाराष्ट्र राज्यातील किमान १५ वर्षाचा रहिवाशी असावा.

६.थकबाकीदार-उमेदवार कोणत्याहि वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

७.व्यवसाय-थेट शेती करणे व्यवसाय वगळता कोणतेही उद्योग, व्यवसाय व व्यापार.

८.भागिदारी-भागीदारीत उद्योग, व्यवसाय व व्यापार करता येईल तथापि बीज भांडवलाच्या प्रकल्पाच्या कमाल रक्कमेची मर्यादा रु.२५.०० लाख राहिल.

९.उपरोक्त विहित मर्यादेच्या आत नोकरीत असलेल्या उमेदवारासही योजनेअंतर्गत लाभ घेता येईल तथापि बीज भांडवल रक्कम प्रत्यक्ष अदा करण्यापूर्वी त्याने नोकरीचा राजिनामा देणे आवश्यक आहे.

## योजनेची ठळक वैशिटये

**१.प्रकल्प किंमत** -

(i) योजनेअंतर्गत उद्योग, व्यवसायाच्या प्रकल्पाची मर्यादा रु.२५.०० लाख.

(ii) उद्योग घटकाच्या बाबतीत प्रकल्प खर्चामध्ये एकूण स्थिर भांडवली गुंतवणुक व खेळत्या भाडवलाचे सिमंतीक भांडवल अंतर्भुत राहिल.

**२.बीज भांडवल सहाय्य -**

(१) बीज भांडवल कर्जाचे प्रमाण बँक/वित्तीय संस्थांनी मंजुर केलेल्या प्रकल्प खर्चाच्या १५ टक्के राहिल. तथापि, बीज भांडवल कर्जाची कमाल मर्यादा रु.३.७५ लाख राहिल.

(२) रु.१०.०० लाखापेक्षा कमी प्रकल्प खर्च असलेल्या प्रकल्पांमध्ये बीज भांडवल कर्जाचे प्रमाण असे राहिल.

(i) सर्वसाधारण प्रवर्गातील लाभधारकांसाठी ---------------------------**१५ टक्के**

(ii) अनु.जाती/जमाती, अपंग, विमुक्त व भटक्या जाती/जमाती आणि इतर मागासवर्गिय उमेदवारांना ------------------------------**२० टक्के**

(३) **बीज भांडवल सहाय्यावर आकारवयाचे व्याज**

**(i)** बीज भांडवलाची रक्कम मृदु कर्ज (सॉफ्ट लोन) म्हणून दरसाल ६ टक्के व्याज आकारले जाते.

**(ii)** बीज भांडवल कर्जाच्या रक्कमेची नियमितपणे विहित कालावधीत परतफेड करणा-या लाभार्थिना परतफेडीच्यावेळी ३ टक्के रिबेट देण्यात येतो.

**(iii)** बीज भांडवल कर्जाच्या रक्कमेची नियमितपणे विहित कालावधीत परतफेड करण्यात आली नाही तर थकीत रक्कमेवर द.सा.द.शे.१ टक्के दंडनिय व्याज आकारण्यात येते.

**(iv)** लाभार्थिने कर्जाचा गैरवापर केला अथवा चुकीची माहिती पुरवून योजनेचा लाभ घेतल्याचे तसेच योजनेच्या अटी शर्तीचा भंग केल्याचे आढळल्यास बीज भांडवलाची रक्कम २ टक्के दराने दंड व्याज आकारुन एक रक्कमी वसुल करण्यात येते.

(४) **बीज भांडवल कर्जाची परतफेड**

(i) उद्योग प्रवर्गासाठी विलंबावधी कालावधी ३ वर्षाचा असून तीस-या वर्षी तीन वर्षाचे व्याज व पुढील चार वर्षात समान हप्त्याने मुध्दल व व्याज मिळून एकूण ७ वर्षात परतफेड करणे आहे.

(ii) वाहतूक व्यवसायासाठी/व्यापार व सेवा उद्योग प्रकल्पासाठी विलंबावधी कालावधी ६ महिन्यांचा असेल व सहाव्या महिन्यात विलंबावधी कालावधीतील व्याज व पुढील चार वर्षात समान हप्त्यामध्ये मुध्दल व व्याज मिळून एकूण साडेचार वर्षात परत फेड करणेचे आहे.

संपर्क

योजनेअंतर्गत विहित नमुन्यातील अर्ज विनामुल्य उपलब्ध असुन अर्ज भरण्यासाठी व आवश्यक माहितीसाठी जिल्हा उदयोग केंद्र,कार्यालय-रायगड-अलिबाग तसेच तालुका स्तरावर पंचायत समिती कार्यालयात संबंधितांनी ठराविक दिवशी उद्योग निरिक्षकाशी संपर्क साधावा.